वर्ष- १२ | अंक- ०९ | मुंबई, मंगळवार,१३ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
PG|2
पोटावरील चरबी कमी करण्यासाठी या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक
पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक
3 → महिलांविषयक सुधारणांत अजूनही अडथळेच !
महाराष्ट्र हादरला, मुलीसोबत कॉफी पिल्याने जमावाकडून सुलेमानची हत्या ← 4
www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

अखेर डेडलाइन संपली!

महाराष्ट्रातील २७ लाख वाहनांना अद्यापही एचएसआरपी नाही



एचएसआरपी का आवश्यक? अर्ज कुठे?

- एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंधनकारक
- एप्रिल २०१९ नंतर नोंदणीकृत सर्व नवीन वाहनांमध्ये एचएसआरपी आधीपासून बसविलेल्या असतात
- आधीच एचएसआरपी असलेल्या वाहनांना बदल करण्याची गरज नाही
- वाहतूक विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in या वेबसाइटवर एचएसआरपी बसवण्यासाठी अपॉइंटमेंट बुक करता येईल

मुंबई। राज्यातील जुन्या अर्थात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट्स बसवण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपली. राज्य परिवहन विभागाकडे एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी आतापर्यंत जवळपास १ कोटी अर्ज दाखल झाले आहेत. मात्र, यापैकी केवळ ७३ लाख वाहनांना एचएसआरपी प्लेट्स बसविण्यात आल्या आहेत. अद्याप २७ लाखांहून अधिक वाहनधारकांना एचएसआरपी पाट्यांची प्रतीक्षा असून ही प्रक्रिया पुढील काही आठवड्यांत प्रक्रिया पूर्ण होणार आहे. एचएसआरपी लावण्याची सुरुवातीची अंतिम मुदत ३१ मार्च २०२५ होती, त्यानंतर अनेकदा मुदत वाढवण्यात आली आणि अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ निश्चित करण्यात आली होती. मात्र, पुन्हा मुदतवाढीबद्दल अद्याप कोणतीही नवीन घोषणा केली नसल्यामुळे, नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आरटीओकडून लवकरच अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे. "पुढील मुदतवाढीबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नसल्यामुळे, नियमांचे पालन लवकर व्हावे यासाठी अंमलबजावणी सुरू केली जाईल," असे एका वरिष्ठ परिवहन अधिकाऱ्याने सांगितले. वर्षाच्या अखेरीस अर्जांमध्ये अचानक जास्त वाढ झाल्यामुळे अधिकृत फिटमेंट केंद्रांवर अपॉइंटमेंट मिळण्यात विलंब झाल्यामुळे प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

अंमलबजावणीसाठी अरटीओ आणि वाहतूक पोलिस सज्ज

एचएसआरपी नसताना वाहन चालवल्यास काय? आवश्यकता का? दंड किती?

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांसाठी एचएसआरपी बंधनकारक आहे. वाहनांची ओळख अधिक अचूक व्हावी आणि वाहनचोरीला आळा बसावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. एप्रिल २०१९ नंतर नोंदणीकृत सर्व वाहनांमध्ये ब्ररफ्ढ आधीपासूनच बसविलेल्या असतात. त्यामुळे ज्या वाहनांवर आधीच नियमांनुसार एचएसआरपी प्लेट आहे, त्या वाहनमालकांना प्लेट बदलण्याची गरज नाही, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

- तात्काळ चलन (चालान)

तपासणी सुरू झाल्यानंतर रस्त्यावर वाहन तपासणीदरम्यान एचएसआरपी नसल्यास तात्काळ चलन आकारले जाऊ शकते. हा दंड जागेवरच भरावा लागेल आणि टाळण्याचा पर्याय राहणार नाही.

- कायदेशीर कारवाईची शक्यता

वारंवार एचएसआरपी शिवाय वाहन चालवताना आढळल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. यामुळे दंडाची रक्कम वाढू शकते (प्रथम उल्लंघन केल्यास दंडाची रक्कम १००० रुपयांपर्यंत असू शकते. तर दुसऱ्यांदा उल्लंघन केल्यास ही रक्कम ५००० ते १०००० रुपयांपर्यंत असू शकते) आणि वाहन नोंदणी निलंबित होण्याचीही शक्यता आहे.

- वाहनाच्या पुनर्विक्री मूल्यात घट

एचएसआरपी नसलेले वाहन कायदेशीर निकषांनुसार अपूर्ण मानले जाते. त्यामुळे अशा वाहनाचे पुनर्विक्री मूल्य मोठ्या प्रमाणात घटू शकते आणि खरेदीदारही असे वाहन घेण्यास टाळाटाळ करू शकतात.

तपासणी आणि दंडाची शक्यता

वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून लवकरच तपासणी सुरू होण्याची शक्यता आहे. ज्या वाहनांवर एचएसआरपी नसेल, त्यांच्यावर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई होऊ शकते. मात्र सुरुवातीच्या टप्प्यात तात्काळ दंडाऐवजी नियमांची अंमलबजावणी आणि नागरिकांनी एचएसआरपी बसवून घ्यावे, यावर अधिक भर दिला जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच, ज्या वाहनधारकांनी आधीच एचएसआरपीसाठी अर्ज केला असेल त्यांच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही.

मुंबईतील 'तो' अपघात चालकाच्या 'या' चुकीमुळेच

पोलिस तपासातून धक्कादायक खुलासे



तपासात काय उघड झाले?

या अपघाताची सखोल चौकशी मुंबई पोलिसांकडून सुरू असून, तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, हा अपघात कोणत्याही तांत्रिक बिघाडामुळे नाही, तर चालकाच्या निष्काळजीपणामुळेच झाला आहे. मुंबई पोलिसांनी शुक्रवारी दिलेल्या माहितीनुसार, अपघाताच्या वेळी बस चालक संतोष सावंत याने आधी बसचा एक फेरा पूर्ण केला होता. त्यानंतर तो बस दुसऱ्या फेऱ्यासाठी सुरू करत असताना ही दुर्घटना घडली. यामुळे चालकाचा हा दावा खोटा ठरतो की, आधीच्या चालकाने बस ड्राइव्ह मोडमध्ये ठेवून हँड ब्रेक ओढलेला होता.

मुंबई। भांडूप पश्चिम येथे रेल्वे स्थानक परिसरातील बस्ट बसचा थांबा आहे. यामुळे नेहमीच येथे बस पकडण्यासाठी प्रवाशांची मोठी गर्दी असते. २९ डिसेंबर रोजी रात्री ९.३० च्या सुमारास एक मोठी दुर्घटना घडली. बेस्टच्या एमएच ०१, सीवी ६५१५ या क्रमांकाच्या इलेक्ट्रीक बसने ११ प्रवाशांना चिरडले आहे. बस मागे घेत असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस गर्दीत घुसली. रात्रीची वेळ असल्यामुळे स्टेशन परिसरात प्रवाशांची मोठी गर्दी होती त्यावेळी ही घटना घडली आहे. बस खाली येऊन दोन महिलांचा मृत्यू झाला आहे.

घटनास्थळी पोलीस आणि रुग्णवाहिका दाखल झाल्या होत्या. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, चालकाने ब्रेकऐवजी चुकून एक्सीलेटर दाबला, त्यामुळे बस अचानक उडी मारून पुढे गेली आणि रस्त्यावर उभ्या असलेल्या लोकांना जोरदार धडक बसली. पोलिसांनी स्पष्ट केले की, चालकाने सुरुवातीला दुसऱ्या चालकावर आरोप करून तपास यंत्रणेला दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, चौकशीनंतर हे स्पष्ट झाले आहे की, अपघातासाठी पूर्णपणे चालकच जबाबदार आहे. या प्रकरणात पोलिसांनी चालकाला अटक केली असून, त्याला शनिवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्यात आले आहे.

तसेच बसमध्ये कोणतीही तांत्रिक बिघाडाची समस्या नव्हती, असेही तपासात निष्पन्न झाले आहे. संतोष सावंत हा इएरळचा कायमस्वरूपी कर्मचारी असून, त्याला जवळपास २० वर्षांचा वाहन चालवण्याचा अनुभव आहे.

प्रत्येक वाहनांची कसून तपासणी करा...

अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी



मुंबई। मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणूक कालावधीत मुंबईतील प्रत्येक वाहनांची कसून तपासणी करा, असे निर्देश मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त जोशी यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले आहेत.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठीची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने आणि सतर्कतेने पार पाडावी. पारदर्शक निवडणुकीसाठी नेमलेल्या सर्व समित्यांनी तत्पर राहून कार्य करावे. संपूर्ण मुंबई महानगरात नेमलेल्या स्थिर निगराणी पथकातील कर्मचाऱ्यांनी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करावी. तसेच, 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' अभियान प्रभावीपणे राबवून मतदारांपर्यंत माहिती पोहोचवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. मुंबई मनपाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शनिवारी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, राबविण्यात आलेल्या 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' अभियानाची निवडणुकीतही प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक मतदारांपर्यंत त्यांच्या मतदान केंद्रांची माहिती पोहोचेल, हे सुनिश्चित करावे, असे निर्देशही डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले.

यावेळी सहआयुक्त विश्वास शंकरवार, विविध परिमंडळांचे उपायुक्त, कोकण विभागाच्या अपर आयुक्त फरोग मुकादम, गजानन बेल्लाळे उपस्थित होते. प्रत्येक मतदान केंद्रांवर किमान निश्चित सुविधांची लवकरात लवकर पूर्तता करावी. मतमोजणी केंद्रांचा सुनियोजित आराखडा तयार करावा. निवडणुकीच्या सर्व प्रक्रियेत प्रशासनाने तत्पर राहावे तसेच विविध पथकांनी अत्यंत सक्रियपणे आणि दक्षतेने कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

'गावात १००० मुली याच संकटात गुंतून पडल्या'

या प्रकरणात माध्यमांशी बोलताना ती मुलगी म्हणाली की, 'आमच्या गावात १००० मुली याच संकटात गुंतून पडलेल्या आहेत. आमच्या कुटुंबातील सदस्य ग्राहकांकडून पैसे वसुली करण्याचे काम करायचे. रतलाम पोलीस ऐकत नाहीत, नंतर भोपाळला पळून गेला आहे'. अशातच या प्रकरणी एफआरआय दाखल करण्यात आल्याचं वृत्त आहे.

यानंतर पीडित मुलगी म्हणाली की, 'माझ्या कुटुंबाने किंवा नातेवाईकांनी मला हे चुकीचं आहे असं कधीच सांगितलं नाही. माझा भाऊ, बहीण, आई-वडील यांनी माज्या इतर तीन बहिर्णींना देखील असंच कृत्य करण्यास भाग पाडलं गेलं आणि ते तिथून पळून गेले होते. ग्राहकांकडून २०० रुपये घेतल्यानंतर आम्हाला आत पाठवण्यात आले.' असं पीडितेनं सांगितलं. ती मुलगी आता आपल्या घरी परतत नसून न्यायाची मागणी करू लागली आहे.

काका, भाऊ आणि वडील ग्राहकांना घरी बोलावतात नंतर आमच्यासोबतच...

'या' समाजात लेकींना ढकललं जातं वेश्याव्यवसायात

मुंबई। मध्य प्रदेशात एक मन सून्न करून टाकणारी घटना घडली आहे. बच्छाव समाजातील एका मुलीसोबत भयानक कृत्य घडलं आहे. तिने न्यायालयात धाव घेत आपल्यासोबत घडलेल्या घटनेचा पाढा वाचून दाखवल्याचं वृत्त समोर आलं आहे. बच्छाव समाजात एक वाईट प्रथा आजही आहे. त्याच प्रथेबाबत पीडितेनं न्याय व्यवस्थेला घडलेल्या घटनेची माहिती दिली आहे. याच प्रथेचे बंध तोडून रतलाम जिल्ह्यातील एक मुलगी भोपाळमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी गेली होती. त्यानंतर तिने माध्यमांशी बोलताना सांगितलं की, स्थानिक पोलीस ऐकत नाहीत, अ स ा तिचं म्हणणं होतं.

'आमच्या कुटुंबातील पुरुष काम करत नाहीत'

या प्रकरणात माध्यमाशी बोलताना पीडितेनं सांगितलं की, आमच्या कुटुंबातील पुरुष काम करत नाहीत. सर्व मुलींच्याच कमाईवर जगत असतात. ग्राहक शोधून आमच्या घरी आणले जाते. मुलीने नंतर सांगितलं की, मला वैश्याव्यवसायाच्या तावडीतून सुटायचे आहे. पीडितेनं भोपाळमधील महिला पोलीस ठाण्यात आई-वडिलांविरोधात आणि मामांविरोधात एफआरआय दाखल केला. नंचर तिच्या बहिणी देखील या प्रकरणात अडकून बसलेल्या आहेत. त्यांच बहिर्णींना यातून बाहेर काढायचे होते.

सर्वच मुली याच कामात गुंतून राहिल्या

मुलीने सांगितलं की, 'आमच्या गावातील सर्वच मुली याच कामात गुंतून राहिलेल्या होत्या. मी शाळेत जायचे तेव्हा मला १४ व्या वर्षी मला वैश्यव्यवसायात ढकललं. घरामध्ये असे ग्राहक आणले जात होते. जेव्हा तिनं घराबाहेर शिकवणीच्या निमित्ताने पाऊल टाकलं तेव्हा आपल्यासोबत घडत असलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. नंतर तिने पोलीस ठाण्यात तक्रार देखील दाखल केली होती. तिथून घरी जाण्यासाठी अनेकदा माझ्यावर दबाव देखील आणला होता. वन स्टॉप सेंटरने माझ्या कुटुंबातील सदस्यांकडून पैसे घेतले आहेत.'



नवी मुंबईत पत्नी आणि तिच्या मामाकडून अश्लील व्हिडीओ पाठवून छळ

सतत चॅटिंग अन्... अखेर, तरुणाचं टोकाचं पाऊल

नवी मुंबई। नवी मुंबईतील रबाळे भागात एका २७ वर्षीय तरुणाने मानसिक त्रास सहन न झाल्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पत्नी आणि तिच्या मामाकडून सोशल मीडियावर अश्लील व्हिडीओ पाठवून सतत छळ केला जात असल्याचा आरोप करत मृताच्या नातेवाईकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात मृताची पत्नी वैष्णवी तुपसौंदर (२५) आणि तिचा मामा संतोष ढगे यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.


मृत तरुणाचं नाव विनोद तुपसौंदर (२७) असून रबाळे येथील साई नगर परिसरातील रहिवासी होता. जून महिन्यात त्यांचा नाशिकच्या वैष्णवी नाटकर या तरुणीशी विवाह झाला होता. लग्नानंतर काही काळ दोघे सुखाने संसार करत होते. मात्र काही दिवसांपासून त्यांच्यात सतत वाद होत होते.

पतीच्या इंस्टा अकाउंटवर पत्नीचे अश्लील व्हिडीओ...

आरोपी वैष्णवी ही तिचा मामा संतोष ढगेशी मोबाइलवर सतत बोलत होती आणि नेहमी चॅटिंग करत होती. ही बाब विनोदला कळताच दोघांमध्ये भांडणं सुरू झाली. एके दिवशी, वैष्णवी रागाच्या भरात माहेरी निघून गेली. त्याच दिवशी कोणीतरी विनोदच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर वैष्णवीचे अश्लील व्हिडीओ पाठवले. हे व्हिडीओ संतोष ढगे यानेच पाठवल्याचा संशय मृताच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला. या घटनेमुळे विनोद पूर्णपणे खचून गेला आणि मानसिकदृष्ट्या अस्वस्थ झालेल्या विनोदने अखेर २५ सप्टेंबर रोजी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. पत्नी आणि मामाकडून होणाऱ्या सततच्या मानसिक त्रासाला आणि अपमानाला कंटाळून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा दावा त्याच्या नातेवाईकांनी केला आहे.

मृताच्या कुटुंबियांनी नोंदवली तक्रार

मृताच्या कुटुंबीयांनी रबाळे पोलिस स्टेशनमध्ये धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन वैष्णवी आणि संतोष ढगे यांच्यावर आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा गुन्हा दाखल केला आहे. सध्या पोलीस या घटनेचा तपास करत असून, या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अशा मानसिक छळाच्या घटना समाजात वाढत असल्याने, कौटुंबिक संबंध आणि सोशल मीडियाच्या वापरावर नियंत्रण आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.



वीस हजार लाच मागितली, एसीबीने पोलीस अधिकाऱ्याला रंगेहात पकडलं!

अधिकाऱ्याला लाच स्वीकारताना रंगेहात पकडलं

एसीबीने तक्रारीची प्राथमिक तपासणी केल्यानंतर एक योजना आखली. या सापळ्यात बिडगर यांना लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आलं. तसेच, त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, आरोपी अधिकाऱ्याकडून सविस्तर चौकशी केली जात आहे.



ठाणे। ठाणे जिल्ह्यातून भ्रष्टाचाराचा एक गंभीर प्रकार समोर आला आहे. अँटी-करप्शन ब्यूरो म्हणजेच भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने उल्हासनगर पोलीस स्टेशनमधील सहायक पोलीस निरीक्षकाला लाच घेताना रंगेहाथ पकडलं.

या ४८ वर्षीय अधिकाऱ्याचं नाव संजय धोंडिराम बिडगर असून त्याने एका प्रकरणात गुन्हेगाराला मदत करण्याच्या बदल्यात २० हजार रुपयांची मागणी केली होती.

अटक न करण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी

मिळालेल्या माहितीनुसार, प्रकरणातील तक्रारदार, त्याचा मुलगा आणि पत्नी यांच्याविरुद्ध उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. आरोपी पोलीस अधिकाऱ्याने संबंधित तक्रारदाराला बोलवून घेतलं आणि त्यांना तसेच त्याच्या कुटुंबियांना अटक न करण्यासाठी २० हजार रुपये देण्यास सांगितलं आणि पैसे न दिल्यास अटक करण्याची धमकी दिली.

तक्रारदाराने ही रक्कम देण्यास नकार दिला आणि थेट एसीबीकडे धाव घेतली. तिथे त्याने त्याच्यासोबत घडलेल्या कृत्याबद्दल सांगितलं.

एसीबीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस दलात कोणत्याही स्वरूपाची लाचखोरी खपवून घेतली जाणार नाही. कायद्यापुढे सर्वजण समान असून, दोषींना कठोर शिक्षा होईल. संबंधित प्रकरण ठाणे परिसरात चचेर्चा विषय ठरल्याचं पाहायला मिळतंय.

धावत्या लोकलच्या बाहेर लटकून तरुणाचा जीवघेणा स्टंट...



मुंबई। मुंबई लोकल ट्रेनमध्ये जीव धोक्यात घालून स्टंट करतानाचा एक धक्कादायक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये एक तरुण हार्नेसच्या मदतीने स्वतःला लोकल ट्रेनच्या दरवाजाला बांधून, चालत्या ट्रेनमधून बाहेर लटकताना दिसत आहे. हा व्हिडीओ ३१ डिसेंबरला 'मुंबई खबर' या सोशल मीडिया हँडलवर शेअर करण्यात आला होता. यावर रेल्वे सेवा यांनीही प्रतिक्रिया देत प्रकरण संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आल्याचे सांगितले. लोकमत टाइम्सच्या वृत्तानुसार, रेल्वे संरक्षण दलाने या धोकादायक स्टंटप्रकरणी संबंधित तरुणाला अटक केली आहे. ३१ डिसेंबरला तक्रार दाखल झाल्यावर आरपीएफने रेल्वे कायद्याच्या कलम १५४ आणि १४५(ब) अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर मस्जिद बंदर परिसरातील त्याच्या घराजवळ छापा टाकून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. आरोपीचे नाव बाबुल असून तो मूळचा बिहारचा रहिवासी आहे. चौकशीत त्याने स्टंट केल्याची कबुली दिली. हा प्रकार डॉकयार्ड रोड रेल्वे स्थानकाजवळ केल्याचेही त्याने सांगितले. दरम्यान, भविष्यात असे धोकादायक कृत्य पुन्हा करणार नाही, असे आश्वासन दिल्यानंतर आरोपीला नोटीसवर सोडण्यात आल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. याआधी १३ डिसेंबरला सीवूड्स ट्रॅफिक पोलिसांनी पाम बीच रोडवरील एका धोकादायक स्टंटप्रकरणी दखल घेतली होती.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार, १३ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६

गुणकारी दुधीभोपळा

भोपळा ही अनेकांची नावडती भाजी, भरीत, कोशिंबीर, सूप असे पदार्थ भोपळ्यपासून बनवले जातात. कितीही नावडता असला तरी गुणधर्मामुळे थोड्या प्रमाणात का होईना, परंतु प्रत्येकाने भोपळा खायलाच हवा. चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांपासून पोटाच्या गंभीर विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. भोपळ्याच्या अशाच काही औषधी गुणधर्माबाबत जाणून घेऊ.

भोपळ्यात 'बिटा करोटिन'

■ या घटकाचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे भोपळा हा 'अ' जीवनसत्त्वाचा समृद्ध स्रोत मानला गेलाय. बिटा केरोटिनमधील ऑंटिऑक्सिडंट्समुळे शरीरातील फ्री रेडिकल्सचा सामना अगदी सहज करता येतो.

■ भोपळा हे तापावरचं औषध आहे.

■ भोपळ्यातील विशिष्ट्य प्रकारच्या खनिजांमुळे मेंदूच्या नसांना आराम मिळतो.

■ हृदयरोग्यांसाठी भोपळा वरदान मानला जातो. भोपळ्यात कोलेस्ट्रॉल कमी करण्याची क्षमता असते.

■ आतड्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही भोपळा गुणकारी मानला जातो. भोपळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते.

■ बहुसंख्य महिलांमध्ये लोहाची कमतरता आढळते. अशा महिलांनी भोपळ्याच्या बियांचं सेवन करावं. भोपळ्याच्या बियांमध्ये लोह, झिंक, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम यांचे प्रमाण भरपूर असल्याने बरेच लाभ होतात.

■ पोटाच्या विविध विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट स्वच्छ झाल्याने अनेक रोगांना दूर ठेवता येतं.



नखे अशी सांभाळा

आपल्या शरीरातील कोणताही अवयव मग तो छोटा असो वा मोठा जोपर्यंत स्वस्थ असतो आणि त्याच्या कार्यात कुठेही बाधा येत नसते तोपर्यंत शरीरात कोणत्याही व्याधी निर्माण होत नसतात. मात्र काही वेळा अगदी बारीकसारीक दुखणीही कमालीची वेदनादायक ठरतात. आपल्या बहुतेक सर्व कामामध्ये हाताची बोटे आपण वापरत असतो. अनेक वेळा या बोटांच्या नखांना इजा होतात आणि त्यात पाणी जाऊन पू होतो आणि मग बोटांना ठणका लागतो. त्यावेळी हे उपाय करून पाहावेत.



नख दुभंगणे, जिव्हाळे लागणे

ज्या बोटाला हा विकार असेल त्या बोटाला घट्ट चिकटपट्टी बांधावी. हा विकार अगदी थोडक्या काळासाठी असतो व बरेच वेळा १-२ दिवसांतच बरा होतो.

नखुरडे

बऱ्याच वेळा नखुरडे झाल्याने बोटाला ठणका लागतो. यातही बोटाला चिकटपट्टी घट्ट बांधल्यास नखुरडे लवकर फुटते. दुसरा उपाय म्हणजे शेंदूर व अंड्याचा पांढरा बलक खलून लावल्याने आराम पडतो. शेंदूर हा अँटीसेप्टीक म्हणून काम करतो.

नखे वेळच्या वेळी कापणे

हाताच्या बोटांची तसेच पायाच्या बोटांची नखे वेळच्या वेळी कापणे, त्यात अडकलेली घाण वेळच्या वेळी काढणे हे एकंदर आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. वय वाढत जाईल तसा नखांचा कडकपणा वाढत जातो. वृद्ध वयात तर नखे कापणेही अवघड जाते. अशावेळी पाण्यात बोरीक पावडर टाकून पाय थोडा वेळ बुडवून ठेवावेत व मग नेलकटरच्या सहाय्याने नखे कापावीत. अंघोळ झाल्यानंतरही नखे गरम पाण्यामुळे मऊ पडलेली असतात. त्यावेळी ती काढावीत. तसेच नखे कापताना अगदी त्वचेजवळ कापू नयेत. त्यामुळे जिव्हाळे लागण्याचा संभव कमी होतो.

लहान बाळाची नखे कापतानाही

अगदी लहान बाळाची नखे कापतानाही बाळाची अंघोळ होऊन बाळ झोपले की मगच ती अलगद

सौंदर्यप्रसाधनं ठेवा फ्रीजमध्ये

फ्रीजमध्ये नाशवंत पदार्थ ठेवले जातात. मात्र केवळ नाशवंत खाद्यपदार्थच फ्रीजमध्ये ठेवावेत असं नाही. लवकर खराब होणारी काही सौंदर्यप्रसाधनंदेखील फ्रीजमध्ये ठेवता येतील. फ्रीजमध्ये थंड वातावरणात प्रसाधनांमध्ये बॅक्टेरिया उत्पन्न होण्याचा धोका कमी होतो. त्याबरोबर प्रसाधनाचा रंग आणि आकार सुरक्षित राहतो. अशी कोणती प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत, जाणून घेऊ



■ परफ्यूम नेहमी थंड आणि कोरड्या जागी ठेवायला पाहिजे म्हणूनच परफ्यूम ठेवण्यासाठी फ्रीज ही योग्य जागा आहे. या थंड वातावरणामुळे परफ्यूमचं शेल्फ लाईफ वाढतं.

■ डोळ्याखालील काळी वर्तुळं घालवण्यासाठी आय क्रीम्स वापरली जातात. कोल्ड आय क्रीममुळे डोळ्याखालची सूज कमी होते त्याचप्रमाणे काळवंडलेपणा कमी होतो. आय क्रीम्स फ्रीजमध्ये ठेवावीत.

■ उन्हाळ्यात लिपस्टिक विरघळते. मूळ आकार नाहीसा होतो. अशी विरघळलेली लिपस्टिक लावणं कठीण जातं. शिवाय उष्ण तापमानामुळे लिपस्टिकमधील रसायनांमध्ये बदल घडू शकतो. मूळ रंग हरवण्याचाही धोका असतो. हे सर्व टाळण्यासाठी उन्हाळ्यात लिपस्टिक फ्रीमध्ये ठेवावी.

■ फेशियल मास्क ठेवण्यासाठीही फ्रीज ही उत्तम जागा आहे. बाहेरच्या तापमानात फेशियल मास्कमधील काही महत्त्वपूर्ण घटक नष्ट होऊ शकतात.

■ सध्या ऑर्गेनिक मेकअपचा बोलबाला आहे. अत्यंत चांगले परिणाम मिळत असल्यामुळे ही प्रसाधनं महिलांच्या पसंतीत उतरत आहेत. मात्र ऑर्गेनिक किंवा होममेड प्रसाधनांमध्ये प्रिझर्व्हेटिव्ह नसतात. म्हणून ती लवकर खराब होतात. हे टाळण्यासाठी ऑर्गेनिक प्रसाधनं फ्रीजमध्ये स्टोअर करावीत.

■ व्हिटॅमिन सी युक्त सर्व प्रसाधनं सक्रिय घटकांनी युक्त असतात. त्याचप्रमाणे प्रसाधनांमध्ये रेटिनॉल आणि पेप्टाईड असल्यास अधिक काळजी घ्यावी लागेल. उग्र तापमानात या रसायनांच्या संरचनेत बदल होऊ शकतो. म्हणूनच अशी प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत.

वापरा नॅचरल टोनर

चेहरा ऑईली असेल तर घरगुती बनवलेल्या टोनरच्या सहाय्याने सुस्थितीत राखता येतो. तेलकट त्वचेसाठी काकडीपासून बनवलेले टोनर उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे टोमॅटोपासून बनवलेल्या टोनरच्या वापराने चेहऱ्याचा वर्ण उजळतो आणि मुरुमांची समस्या कमी होते. तुलसी टोनरही विशेष लाभकारक ठरते.

यासाठी तुळशीची पाने चुरडून उकळत्या पाण्यामध्ये सोडावीत. थंड झाल्यावर या पाण्यामध्ये एक चमचा कोरफडीचा गर मिसळावा. आता तयार मिश्रण बाटलीत भरून टोनरसारखे वापरावे, याच पद्धतीने मेथी घालून अथवा हळदीच्या सहाय्याने टोनर बनता येते. हळदीचे टोनर बनवताना एक चमचा लिंबाचा



एखाद्याच्या शारीरिक स्वास्थ्याचा अंदाज शरीराच्या सुदृढतेवरून लावला जातो. त्यामुळे बळकट आणि 'टोन्ड' स्नायू, उत्तम स्टॅमिना आणि अर्थातच न सुटलेले पोट यावरून एखाद्याच्या स्वास्थ्याचा अंदाज लावता येऊ शकतो. नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराने शरीर सुदृढ आणि सुडौल होत असतानाच पोटावर असलेली चरबी कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान ठरू शकते. पोटावर साठलेली चरबी कमी करण्यासाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये याबद्दल अनेक गैरसमजही पाहावयास मिळतात. हे गैरसमज कोणते आणि यामध्ये कितपत तथ्य आहे, हे जाणून घेऊ या.



पोटावरील चरबी कमी करण्यासाठी या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक

व्यायामामध्ये खास पोटावरील चरबी कमी करण्यासाठी केवळ 'क्रन्चेस' केल्याने चरबी कमी होते हा गैरसमज अनेकांच्या मनामध्ये असतो. क्रन्चेस हा व्यायाम प्रकार पोटावरील चरबी घटवण्यास सहाय्यक असला, तरी केवळ याच्यामुळे पोटाचा घेर कमी होतो असे मात्र नाही. क्रन्चेस करून पोटावरील चरबी कमी करतानाच, सर्व शरीरावरील चरबी कमी होईल अशा प्रकारचा व्यायाम केला जावा. त्यामुळे आपल्या व्यायामामध्ये 'स्ट्रेंग्थ ट्रेनिंग' आणि 'हाय इंटेन्सिटी कार्डियो'सारख्या व्यायाम प्रकारांचाही समावेश असावा.

कित्येकदा केवळ ग्रीन टीच्या सेवनाने पोटावरील चरबी घटण्यास मदत होत असल्याचा समजही अनेकांच्या मनामध्ये दिसून येतो. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असल्याचे जरी खरे असले, तरी केवळ ग्रीन टी प्यायल्यानेच पोटावरील चरबी कमी होते असे समजणे चुकीचे आहे. पोटावरील चरबी कमी करण्यासाठी ग्रीन टीच्या जोडीनेच संतुलित, पौष्टिक आहार आणि योग्य व्यायामाचीही आवश्यकता असते. नियमित व्यायाम केल्याने आपल्या मनाला येईल ते आपण खाऊ-पिऊ शकतो अशी समजूत वजन आणि अर्थातच पोटावरील चरबी वाढण्यास कारणीभूत ठरत असते. योग्य आहार आणि नियमित व्यायाम हे एकमेकांना पूरक असून, यांच्यामधील योग्य संतुलन साधता आल्यानेच पोटावरील चरबी घटवता येणे शक्य होत असते.

बाजारामध्ये उपलब्ध असलेले तथाकथित 'लो फॅट', पॅकेज्ड अन्नपदार्थ वजन घटवण्यासाठी चांगला पर्याय असल्याचेही अनेक लोक मानतात. पण वास्तविक आहारामध्ये इतर सर्व पोषक तत्त्वांच्या सोबत स्निग्ध पदार्थदेखील आवश्यक असतात. त्यामुळे आहारातून शरीराला 'गुड फॅट्स' मिळतील असे अन्नपदार्थ आपल्या आहारामध्ये समाविष्ट असायला हवेत. शरीराला चांगले असे स्निग्ध पदार्थ आहारातून घेतले गेल्याने भूक लवकर शमण्यास मदत होत असते. त्यामुळे सातत्याने 'लो-फॅट' पदार्थांच्या सेवनाने शरीराला फायदा होण्याऐवजी नुकसान होण्याची शक्यताच जास्त असते. आपल्या आहारामध्ये तूप, चांगल्या प्रतीची खाद्यतेले यांचा समावेश अवश्य असावा. कमी खाल्ल्याने पोटावरील चरबी कमी होते असाही एक गैरसमज आढळून येत असतो. भोजन घेताना आपण किती खात आहोत याकडे लक्ष असणे अगत्याचे असले तरी आपली भूक मारणे किंवा नावापुरते काही तरी खाऊन अधिक काळ स्वतःला उपाशी ठेवणे याचे अपायच अधिक आहेत.

आपल्या शरीराला आवश्यक तितका आहार मिळाला नाही, तर शरीराची चयापचय शक्ती कमी

हराभरा कबाब

साहित्य : २ मोठे कप भरून मटारचे दाणे, १ मोठा उकडलेला बटाटा, ब्रेड क्रम्बस, आमचूर पावडर, मीठ व थोडीशी साखर, २ ते ३ हिरव्या मिरच्या, आले व लसूण.

कृती : सगळ्यात पहिले कढईमध्ये तेल घेऊन त्यात मटारचे दाणे टाकले. त्यामध्ये थोडी हळद, मीठ, हिरवी मिरची, आले, लसूण, जिरे जाडसर वाटलेले टाकले. १० ते १५ सेकंद वाफवले. नंतर त्यात आमचूर पावडर आणि साखर टाकले व २ मिनिटे परतून घेतले. त्यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर मिक्सरमध्ये जाडसर भरड काढली. मटारच्या जाडसर भरडमध्ये कुस्करलेला बटाटा ब्रेड क्रम्बस व तोडे चवीपुरते मीठ टाकले. मिश्रण एकत्र केल्यावर गोल टिक्की बनवून तळून घेतले.



सोन्याने सजवा रेशमी केस



फॅशनच्या युगात भूतकाळातल्या गोष्टी आल्या तर त्यात काही नवल नाही. कारण राजा-महाराजांच्या काळात मोठ्या कलाकुसरतेने तयार करण्यात आलेले पेहराव, नक्षीदार दागिने आजच्या आधुनिक युगातील कारागिरांना आकर्षित करत असून, त्यात काही बदल करून एक वेगळी नक्षी तयार केली जाते व तीच बाजारात पुन्हा फॅशनच्या रूपाने येते. त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे राजा-महाराजांच्या काळात सोन्याच्या मुलाम्याने केस सजवले जात होते. त्याच नक्षीकडे आजचे कारागीर आकर्षित झालेले दिसतात. फॅशन म्हणजे जुन्या नव्याचे मिश्रणच म्हणता येईल. काळानुसार फॅशनमध्ये बदल झाले आहेत. मात्र त्याच्यामागे भूतकाळ लपला आहे. नव्याने बाजारात असलेल्या हेअर ज्वेलरीवर त्याचा प्रभाव दिसतो.



देवदास, जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, उमराव जान असे काही चित्रपट आहेत, की त्यात नायिकेच्या केसांवर अधिक भर दिलेला दिसतो. भारतीय मुघल साम्राज्यातील शैली त्यात वापरलेली दिसते. या दागिन्यांना सामान्य नागरिकांनी देखील पसंती दर्शवली आहे. घागरा, साडी, सलवार-कुर्ता किंवा शर्ट पॅण्टवर देखील हे दागिने परिधान केले जाऊ शकतात. या दागिन्यांमध्ये हिरे, मोती, माणिक यांचे वर्क केले जात असल्याने त्यांच्या वजनानुसार त्यांची किंमत ठरवली जाते. रेशमी केसांकरिता तयार करण्यात येणारे दागिने शुद्ध सोन्यात केले जातात. मात्र कमी बजेटमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याची पॉलिश करून ते खरेदी करता येऊ





आल्याचा ज्यूस आरोग्यासाठी फायदेशीर

■ आल्याच्या रसामुळे डायबेटिज कंट्रोल होण्यास मदत होते. यातील अँटी डायबेटिक गुणधर्मामुळे डायबेटिज नियंत्रित राहतो.

■ पचनाचा त्रास असल्यास त्यावर आल्याचा रस उत्तम. आल्याच्या रसाने पचन नीट होते.

■ कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी होण्यासाठी आल्याचा रस घेणे फायदेशीर.

■ आल्याच्या रसाच्या सेवनाने मुरुमे कमी होतात.

■ कफाचा त्रास असल्यास त्यावरही आल्याचा रस उत्तम. पावसात सर्दी-खोकल्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे पावसात आल्याचा रस नियमितपणे घेतल्यास सर्दी-खोकल्यापासून बचाव होऊ शकतो.



पालकांमध्ये आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याची क्रेझ काही वर्षांपासून अनेक पटीने वाढली आहे. काही पालक आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याच्या बहाण्याने स्वतःही स्वीमिंग शिकतात. अनेक तज्ज्ञ स्वीमिंगला एका खेळाव्यतिरिक्त व्यायामाचा एक उत्तम पर्याय मानतात. परंतु स्वीमिंग योग्यप्रकारे न केल्यास आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकते. इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयाचे डिपार्टमेंट ऑफ इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सलटेंट डॉ. राकेश गुप्ता यांनी याबाबत काही टिप्स दिल्या आहेत.

सावधान! मुलांना स्वीमिंग शिकवण्याआधी घ्या ही काळजी

आरोग्य तपासणी

मुलांना स्वीमिंगच्या क्लासला पाठवण्याआधी डॉक्टरांकडून मुलाची तपासणी करून घ्या. त्वचेचे संक्रमण, डोळे, नाक, कान, घशाची तपासणी करून घ्या. स्वीमिंग पूलच्या पाण्यात क्लोरिनचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सर्व इंद्रियांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते.

जर मुलाचे वजन अधिक जास्त किंवा अधिक कमी असल्यास अशा मुलांना डॉक्टरांकडून काही सल्ले देण्यात येतात. त्यामुळे मुलांना स्वीमिंगला टाकण्याआधी डॉक्टरांचा जरूर सल्ला घ्या.

स्वीमिंग पूलची स्वच्छता

स्वीमिंग पूलच्या स्वच्छतेवर लक्ष देणे गरजेचे असते. दररोज पूलमध्ये अनेक लोक येत असतात. अशावेळी एखाद्याला त्वचारोग किंवा अन्य काही रोग असल्याचा त्याचा आपल्या मुलालाही धोका होऊ शकतो. त्यामुळे रोज स्वीमिंग पूलचे पाणी बदलले जाते का, स्वच्छ केले जाते का याची चौकशी करा. अनेकदा स्वीमिंग पूल खुल्या जागी असतात. त्यावर छप्पर नसल्यास स्वीमिंग पूलमध्ये पडणाऱ्या धूळ, पावसाचे पाणी तसेच इतर कचऱ्यामुळे संक्रमण होण्याचा धोका असतो.

लाईफगार्ड

सर्व स्वीमिंग पूलमध्ये लाईफगार्ड असणे गरजेचे आहे. काही वेळा एखाद्या साधारण पोहणाऱ्या व्यक्तीला लाईफगार्ड म्हणून उभे केले जाते. अशा व्यक्तीकडे आपत्कालीन परिस्थितीत वाचवण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण नसते. ज्यावेळी स्वीमिंगसाठी येणाऱ्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी अधिक लाईफगार्ड असणे गरजेचे आहे.

प्रथमोपचार सुविधा

सरकारी नियमांनुसार जलतरण तलावात प्रथमोपचार सुविधा आणि इतर सर्व प्राथमिक सुविधा असाव्या. या सुविधा स्वीमिंग पूलच्या जवळ असाव्यात. आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला प्रथम प्राथमिक मदत कक्षात नेणे आवश्यक आहे आणि आवश्यकतेनुसार प्राथमिक मदत दिली गेली पाहिजे.

प्रशिक्षण आणि प्रशिक्षक

पाण्यात उडी मारण्याआधी मुलांना अनुभवी कोचद्वारे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मुलांना पोहण्याचे शिकवण्यावेळी सुरक्षा उपकरणांचा वापर होणे गरजेचे आहे. ग्लासेस, फ्लोटर्स, इयर प्लग, कॅप इत्यादींचा वापर करणे गरजेचे आहे. फ्लोटरमध्ये छोटासाही होल असल्यास त्याची वेळीच दुरुस्ती केली गेली पाहिजे. फ्लोटर्स योग्य नसल्यास पाण्यात मुलांचे संतुलन बिघडण्याचा धोका असतो.

डिहायड्रेशन

पाण्यात पोहत असतानाही शरीरात डिहायड्रेशन होत असते. जास्त घाम येतो. त्यामुळे पाणी सोबत ठेवणे गरजेचे



उन्हाळ्यात एसी चालवण्याआधी हे काम न केल्यास विजेचे बिल येईल भरमसाट

उन्हाळा सुरू झाला आहे. अनेक घरांत २४ तास पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. तुमच्या घरात जर एसी असेल तर तो चालवण्याआधी काही गोष्टी जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी काही खास टिप्स देत आहोत. ज्या तुमच्या वीज बचत करण्यास मदत करू शकतात. तुम्ही जर या टिप्सचा वापर न करता एसी चालवत असाल तर तुमचे वीज बिल जास्त येण्याची शक्यता आहे. नेहमी लोक गरमीत एसी ऑन करतात. परंतु असे करणे चुकीचे आहे. गरमीत एसी सुरू करण्याआधी काही गोष्टी जाणून घेणे खूप गरजेचे आहे. जाणून

घरात एसी असणारे

अनेक लोक असे आहेत. जे वर्षभर एसी चालवत नाहीत. परंतु उन्हाळा सुरू झाला की, घरातील एसी अचानक सुरू करतात. परंतु त्याआधी काही गोष्टी जाणून घेत नाही. त्यामुळे महिन्याचे बिल जास्त येते.



एसी सर्व्हिस करणे आवश्यक

काही महिन्यापासून बंद पडलेला एसी अचानक तुम्ही जर उन्हाळ्यात सुरू करीत असाल तर काही गोष्टी जाणून घ्यायला हव्यात. एसीला सुरू करण्याआधी त्या एसीची सर्व्हिस करणे खूप आवश्यक आहे. असे केल्याने केवळ गरमीत थंड हवा मिळत नाही तर वेळोवेळी सर्व्हिसिंग केल्याने तुमच्या एसीची लाइफसुद्धा वाढते. जर तुम्ही विना सर्व्हिस एसी सुरू ठेवत असाल तर तुमची खोली एसीने थंड होईल, पण महिन्याला विजेचे बिल भरमसाट येऊ शकते.

एसी गॅस संबंधी हे काम करणे आवश्यक

जितकी आवश्यक एसी सर्व्हिस आहे. तितकेच आवश्यक एअर कंडिशनरमधील गॅस चेक करणे आहे. उन्हाळा सुरू होण्याआधी विनागॅस चेक करता एसी सुरू केला तर होऊ शकते की, तासभर एसी चालवल्यानंतर तुम्हाला थंड एसी मिळणार नाही. कूलिंग कमी होऊ शकते. कारण कम्प्रेसरवर दबाव वाढतो. यामुळे तुमचा एसी खराब होऊ शकतो. तुम्हाला हा एसी दुरुस्त करण्यासाठी मोठी रक्कमसुद्धा मोजावी लागू शकते.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १३ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६

संपादकीय

महिलांविषयक सुधारणांत अजूनही अडथळेच !




संपादक दिपक मोरेश्वर नाईक



बदलत्या काळासरशी महिलाविषयक प्रश्नांचे स्वरूप आणि गांभीर्यही बदलत आहे. हे प्रश्न अधिकाधिक जटिल होत असून चार भिंतींबरोबरच समाजातही स्त्री सुरक्षित नसल्याचे चित्र आता नवीन राहिलेले नाही. खरेतर तिच्या सर्व प्रकारच्या संरक्षणासाठी कायद्यांची कमतरता नाही. मात्र हे कायदे सर्वापर्यंत पोहोचत नाहीत, अनेक शक्ती त्याच्या अंमलबजावणीमध्ये खोडा घालण्याचा, दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि अंतिमतः स्त्री संरक्षणार्थ उभी केलेली ही यंत्रणा तोकडी पडते हेच चित्र २०२५ मधील काही घटनांनी दाखवून दिले आहे. यातील काही ठळक घटनांचा परामर्श घेता कऱ्हाडमधील डॉक्टर संपदा मुंडे आत्महत्या प्रकरण, पुण्यातील हगवणे प्रकरण तसेच पंकजा मुंडे यांच्या सचिवाच्या पत्नीने पतीच्या अनैतिक संबंधाला कंटाळून केलेली आत्महत्या अशी अनेक उदाहरणे समोर येतात. इतरही अनेक घटना आहेत, इथे त्यांची जंत्री मांडणे शक्य नाही. मात्र त्यामध्ये अनेक महिलांचा शेवट झाला वा घडवून आणण्यात आला हेदेखील नाकारून चालणार नाही. सरत्या वर्षाला निरोप देत २०२६ चे स्वागत करताना या प्रश्नावर साधकबाधक चर्चा करायलाच हवी. मी ग्रामीण भागामध्ये काम करते. याच भागात राहते. रोजच्या अनुभवातून आजच्या काळात स्त्रियांकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन, येथील महिलांचे जीवनमान-जीवनशैली फारशी बदललेली नसल्याचे तीव्रतेने जाणवते. म्हणूनच समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारला असल्याचे विधान ढोबळमानानेही करावेसे वाटत नाही.

ग्रामीण, आदिवासी, दुर्गम भागामधील महिलाविषयक प्रश्नांमध्ये फारसा फरक दिसत नसल्याचे खेदाने नमूद करावेसे वाटते. वानगीदाखल अगदी अलीकडचा व्याख्यान देते वेळी अनुभवलेला एक प्रसंग सांगते. माझे बोलणे संपल्यावर एक तरुण उभा राहिला. त्याला आजूबाजूच्या लोकांनी खुणा करून बोलण्यास उभे केल्याचे दिसत होते. त्याच्या प्रश्नाचा रोख बायकांचेच इतके लाड का होतात, त्यांच्यासाठीच इतके कायदे का आहेत, कोर्टातही त्यांचीच बाजू का घेतली जाते, त्यांना प्राधान्यक्रम का दिला जातो अशा तक्रारवजा बोलण्याकडे होता. त्याच्या या चौकशीत सहजता वा कुतूहल नसून असुया, राग आणि देहबोलीतून विद्वेष व्यक्त होत होता. ही छोटीशी घटना बोलकी म्हणावी लागेल, कारण तो विचारणारा एकटा असला तरी भोवती बसलेल्या गटाचे अनुमोदनही लपत नव्हते. थोडक्यात, या सामाजिक मानसिकतेनिशी आपण २०२६ मध्ये म्हणजेच तथाकथित प्रगत आणि आधुनिक युगात प्रवेश करत आहोत, हे विसरता कामा नये. संविधानाच्या कलम १४, १५ वा २५ मध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला समान न्याय असल्याचे सूचित केले आहे. जात, धर्म, लग, पंथ असा भेदभाव न करता घटनेने प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. मात्र समाजाची मानसिकता त्याला अनुकूल नाही. मध्यंतरीच आदिवासी भागातील एक कुटुंब तक्रार घेऊन आले होते. जमिनीच्या मोठ्या खटल्यासाठी साक्षीदार म्हणून मी त्यांच्या पत्नीला बोलवायला सांगितले. तेव्हा माज्याच ऑफिसमध्ये बसून ते महाशय म्हणाले, 'मॅडम, कशाला तिला बोलवायचे? ती काय बोलणार? बाईची अक्कल चुलीजवळ...!' थोडक्यात, आजही ७५ टक्के लोकांमध्ये ही मानसिकता आहे. ग्रामीण भागात ही टक्केवारी आणखी वाढते. याचे दाखले अनेक प्रकरणांमधून दररोज मिळत असतात. त्यातीलच एक म्हणजे, सून नांदत नसल्याची तक्रार घेऊन एक बाई आमच्याकडे आली आणि बोलण्याच्या ओघात सुनेचे चुकले तर मुलगा दोन-चार चापटी मारतो, असे सहज म्हणाली. पोरीच्या जातीने नवऱ्याचे एवढे तर सहन केलेच पाहिजे, असे म्हणत तिने तक्रारीचा पाढा तसाच सुरू ठेवला. अर्थातच ती बाई स्वतःच्या तोंडाने एका महिलेची तक्रार करत असली तरी तिचा आवाज पुरुषी वर्चस्वाने, दबावाने आणि वर्षानुवर्षांच्या पुरुषप्रधान संस्कृतीने घडवलेला होता. अशी एक ना अनेक उदाहरणे देता येतील. अशा मानसिकतेमुळेच सुरूवातीला उल्लेख केलेल्या घटना घडतात आणि अनेक कोवळ्या कळ्या उमलण्यापूर्वीच कोमेजून जातात. २०२५ मध्येही हे चित्र बदललेले नाही. आपल्याला वाढत्या बालविवाहांचा प्रश्नही अद्यापी तडीस लावता आलेला नाही. या प्रश्नाकडे आजही हव्या त्या गांभीर्याने पाहिले जात नाही. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराविरोधात 'पोस्को'सारखा कठोर कायदा आहे. मात्र बालविवाह हा समाजमान्य बलात्कार आहे, हे अजून समाजाला पटलेले नाही. विशेषतः भटक्या समाजामध्ये काही विशिष्ट वर्गामध्ये आजही आठ-नऊ वर्षांच्या मुली आणि १३-१४ वर्षांच्या मुलांची लग्नं लावली जातात. आमच्याकडे आठवड्यातून एकदा तरी अशी एखादी तक्रार येतेच येते. अर्थातच यामध्ये लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण मोठ्या प्रमाणावर होते. लहान वयातच लग्न लावून दिलेल्या मुला-मुलींचे शिक्षण थांबते. त्यांना बालमजूर म्हणून कामाला जावे लागते. अशांमध्ये आरोग्याचे असंख्य प्रश्न निर्माण होतात. वस्तूतः आपल्याकडे बालविवाह थांबवणारा कायदा आहे. पण त्याची अंमलबजावणी हव्या त्या गांभीर्याने होताना दिसत नाही. पूर्वीपेक्षा थोडा फरक घडत असला तरी सुधारणा अत्यंत मंद गतीने होत आहे, हेदेखील विचारात घ्यावे लागेल. पूर्वी बालविवाह थांबवत असताना आम्हाला काही पत्रकारांचेच फोन यायचे आणि कशाला मध्ये पडता, असे म्हणत शहाणपण शिकवले जायचे. काही वेळा तर शासकीय अधिकारीही वेगवेगळ्या विचारणा करून भंडावून सोडायचे. आम्हालाच लेखी तक्रार देण्यास सांगायचे. आता या मानसिकतेत थोडा बदल होत आहे. पण तरीही कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीपासून आपण दूर आहोत, हे लक्षात घ्यावे लागेल. कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक शोषणाचा प्रश्नही बराच गंभीर आहे. २०१३ मध्ये यासंबंधीचा कायदा पारित करण्यात आला. तो अत्यंत चांगला असून याद्वारे कोणत्याही कार्यस्थळी अशा घटनांची, तक्रारींची दखल घेणारी एक समिती असावी, असे निर्देशित करण्यात आले आहे. दहापेक्षा जास्त कर्मचारीवर्ग असणाऱ्या कार्यालयांसाठी ही बाब अनिवार्य आहे. मात्र आजही अनेक ठिकाणी अशी कोणतीही समिती दिसत नाही. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे घरगुती कामे करणाऱ्या महिलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण होत असेल तर त्यांना थेट कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीकडे तक्रार करावी लागते. मात्र दूरच्या भागात काम करणाऱ्या महिलेचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण झाल्यास तिने इतके दूर कसे जायचे, हा प्रश्न उरतो. कारण, कधी कधी हे अंतर शंभर किलोमीटर वा त्यापेक्षा अधिकही असू शकते. हीदेखील कायद्यातील मोठी त्रुटी वाटते. महिलांना स्थानिक ठिकाणीच त्वरित आणि योग्य न्याय मिळायला हवा. चौकशी, साक्षीपुरावे, सुनावणी यासाठी पीडितेने इतका प्रवास करणे, वेळ व पैसा खर्च करणे योग्य वाटत नाही. म्हणूनच तातडीने ही सुधारणा होणे गरजेचे वाटते. नवीन कायदे करण्यापेक्षा महिलांच्या संदर्भातील कायद्यातील अशा छोट्या मोठ्या त्रुटी दूर केल्या तरी खूप काही साधले जाईल, असे वाटते. वकील म्हणून काम करताना अशा अनेक बाबी जाणवतात आणि खटकतात. काही खटल्यांमध्ये मुख्य निकाल येईपर्यंत न्यायालय पीडित स्त्रीच्या चरिताथार्साठी, सुरक्षेसाठी अंतरिम आदेश देते. कायद्यानुसार चार भिंतीमध्ये आई, मुलगी, बायको, बहीण अशा कोणत्याही नात्याने एखाद्या पुरुषाबरोबर राहणारी स्त्री त्याने मानसिक, आर्थिक, शारीरिक छळ केल्यास न्यायालयात दाद मागू शकते. अशा परिस्थितीत घराबाहेर काढली गेलेली आई घराचा हिस्सा मागू शकते, पत्नी निवारा वा खर्च मागू शकते. या महिला संरक्षण वा मुलांची कस्टडी मागू शकतात. हे सगळे मूळ केसचा निकाल होईपर्यंत मिळवता येते. पण असे असले तरी केस दाखल केल्यानंतर चार-पाच वर्षे अंतरिम आदेशासाठी ही अरिगच घेतले जात नाही. थोडक्यात, यामुळे कायद्याचा उद्देशच मागे पडतो आणि पीडितेला विना अन्न, निवारा तसेच संरक्षणविना दिवस काढावे लागतात. तिची सर्वार्थाने आबाळ होते आणि तरतुदीचा उपयोगच संपतो. काही वेळा न्यायालयाने अंतरिम आदेश देत पीडितेला मदत करण्याचे सांगितले तरी मंजूर झालेली रक्कम वसूल करण्यासाठीही तिला बराच त्रास सहन करावा लागतो. नवरा वा संबंधित लोक यावेळीही तिला प्रचंड त्रास देतात. मुद्दाम गैरहजर राहणे, कमी रक्कम देणे, पैसे टाळण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरणे असे प्रकार सर्रास घडतात. या सगळ्यातून होणारा त्रास दूर करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. थोडक्यात, येत्या वर्षात कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे ठरवले तरी आपण बरेच पुढे जाऊ, असे म्हणता येईल. २०२६ मध्ये हे घडेल, अशी अपेक्षा करू या.



प्रत्येक आई बाबांना एक अतिशय महत्वाचा निर्णय घ्यावा लागतो आणि तो म्हणजे मुलांना शाळेत घालायचा निर्णय. शाळा म्हटले की, कोणत्या माध्यमात त्यांना घालायचे हा कळीचा मुद्दा. मुलीला जेव्हा शाळेत घालायची वेळ आली तेव्हा तिने मराठी माध्यमात शिकणे हेच नैसर्गिक आहे, या विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयातून माझी मुलगी मराठीत शिकू लागली नि इंग्रजी बोलणे वा लिहिणे, याबाबत तिला कोणतीही अडचण आली नाही. एक- दोन मुले सोडली तर आमच्या जवळपास कुणीही मराठीत शिकत नव्हते. २००२ पासून हा मराठी शाळांचा विषय माझे आयुष्य व्यापून राहिला आहे. आयुष्यातली उमेदीची वर्षे या प्रश्नाला वाहून काम केले. गेली पाच सहा वर्षे मात्र मराठी शाळांच्या विषयाने मन अधिकच अस्वस्थ आणि मुख्य म्हणजे निराश झाले. हा विषयच समाजाला नि मराठी माणसांना आपला वाटेनासा झाला आहे हे दिसत होते. केवळ कार्यकर्त्यांच्या आंदोलनानी जाग येणार आहे का? तर नाही. मराठी शाळांकडे शासनाने पाठ फिरवली नि हीन दिन झालेल्या शाळा नकोत म्हणून पालकांनी त्यांना आयुष्यातून बाद केले. आता काळ उलटा फिरवून चुका दुरुस्त करता येतील का, तर ते शक्य नाही. स्वतः जी पिढी इंग्रजी शाळांमध्ये शिकली नि शिकते आहे, ती आपल्या मुलांना एकदम भावनिक होऊन मराठी शाळेत शिकवेल का? असे स्वप्नरंजन करणे मनाला समाधान देते पण वास्तव वेगळच आहे नि त्याच्यापासून पळता येणे शक्य नाही. सरत्या वर्षाला एका बातमीने लक्ष वेधून घेतले. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच मराठी माध्यम आणि मराठी शाळा या विषयावरील 'क्रांतिज्योती विद्यालय' हा चित्रपट प्रदर्शित होतो आहे. खूप वर्षे मनात होते की नाटक, चित्रपट, एकांकिकांच्या, कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी शाळांचा विषय समाजासमोर यावा. 'हिंदी मिडीयम' नावाचा चित्रपट काही वर्षांपूर्वी पाहिला तेव्हापासून तर मराठी शाळांसाठी काही विषय का सुचत नाही असे राहून राहून वाटत होते. मग लक्षात आले, कुठले निमार्ते हा विषय घेऊन चित्रपट काढणार? आता हे घडतंय ही गोष्ट मराठी शाळांमध्ये जीव गुंतलेल्या माणसांना दिलासा देणारी आहे. शाळा हा प्रमुख विषय आहेच पण मायभाषेचा विचार अनेक अंगांनी करायला लागणार आहे. आंदोलनांपासून सकारात्मक अथवा रचनात्मक कामांपर्यंत सर्व पैलूंचा विचार करावा लागणार आहे. मुख्य म्हणजे तरुणाई आपल्या भाषेकडे कशी पाहते हे महत्वाचे आहे. मराठीचे पुढल्या काळातील स्वरूप कसे राहील याचा कृतिशील विचार सर्वांनाच करावा लागणार आहे. शासन, राजकीय पक्षांपासून सामान्य माणसापर्यंत सर्वांनाच! वर्ष संपत आले की, आपण ताळेबंद मांडतो, चांगल्या वाईटाचा, यशापयशाचा, हरवल्या- गवसल्याचा, जिंकल्या - हरल्याचा. १९६० म्हणजे आपल्या राज्य स्थापनेपासून आजतागायत इतकी वर्षे झाली मायभाषेच्या प्रश्नांचा, तिच्या विकासाचा आणि जोपासनेचा आपण काही जमाखर्च मांडला का? काही संकल्प केला का? आपली भाषा आपल्याला किती हवी आहे हे सरत्या वर्षाला स्वतःला विचारणे आणि ती सोबत हवी असेल तर तिचे पांग फेडणे ही आपली सामुहिक जबाबदारी आहे, हे मान्य केले तरी माज्या या सदराचे सार्थक होईल.

'हम हिंदुस्तानी': कृतज्ञतेचा एक 'लष्करी' सोहळा!

-विजयकुमार कट्टी

खरं तर, ३ जानेवारीची ती संध्याकाळ आमच्यासाठी केवळ एका 'कार्यक्रमाची' तारीख नव्हती, तर ती एका भारावलेल्या प्रतीक्षेची सांगता होती. मी आणि माझी पत्नी रोहिणी, गेल्या आठवड्याभरापासून एखाद्या सणासारखी या दिवसाची वाट पाहत होतो. ठीक पाच वाजता आम्ही ठाण्यातील 'श्री संत गजानन महाराज पाटेकर सभागृहात' पाऊल ठेवलं आणि तिथेच या कार्यक्रमाचं वेगळेपण जाणवलं. लष्करी शिस्त काय असते, याचा प्रत्यय कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच आला.

मेजर प्रांजल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गोष्ट इतकी 'शार्प' आणि वेळेवर होती की, संरक्षण दलाची शिस्त आणि गांभीर्य आम्ही केवळ ऐकून होतो, त्या दिवशी ते प्रत्यक्ष अनुभवलं. कार्यक्रमाची सूत्रधार ज्योती हिने आपल्या नावाप्रमाणेच संपूर्ण सभागृहात प्रकाशाची लकेर पसरवली. तिचं निवेदन म्हणजे माणुसकी आणि आपुलकीचा एक सुंदर पूलच होता.

दिलीप गुप्ते सरांनी साध्या सोप्या भाषेत सैन्यदलाचा इतिहास, त्यांची रचना आणि पराक्रम मांडला, तर गायक कलाकारांनी आपल्या सुरांनी वातावरण भारून टाकलं. पण हे कलाकार! हे कोणी व्यावसायिक 'स्टार्स' नव्हते. किरण सुले, अनघा अधिकारी, मनिष कर्णिक, राजन गुप्ते, हेमंत रणदिवे, वासू फांसे, संजन गडकरी, शिवानी गडकरी आणि स्नेह प्रधान... हे सगळे अस्सल 'माणसं' होती. त्यांच्या गाण्यात एक विलक्षण प्रामाणिकपणा होता. मूळ गाण्याबद्दलचा आदर त्यांच्या स्वरातून ओसंडून वाहत होता.

"आम्ही अजून शिकतोय" ही त्यांची साधी कबुलीच त्यांना प्रेक्षकांच्या काळजाच्या इतक्या जवळ घेऊन गेली की व्यावसायिक गायकही तिथे फिके पडले असते.

कार्यक्रमातील गाणी आणि त्यासोबत उलगडलेले सैन्यदलाचे 'अंतरंग' काहीसे असे होते :

१. ताकत वतन की हमसे है : संरक्षण दलाच्या भक्कम रचनेचा पाया जणू या गाण्यातून उलगडला.

२.गर्जा महाराष्ट्र माझा : 'आर्मीच्या प्रिन्सेस' आणि महाराष्ट्राच्या शौर्याची गाथा या सुरांनी गरगली.

३.हर करम अपना करेंगे : देशासाठी जगणं आणि मरणं म्हणजे काय, हे 'रँक्स आणि पोस्ट'च्या माहितीसह उमजलं.

४.कंधो से मिलते है कंधे : लष्कर, नौदल आणि वायुदलाच्या एकजुटीचं दर्शन या गाण्यातून घडलं.

५.मेरा जूता है जपानी : साध्या उपकरणांनी अद्ययावत शस्त्रास्त्रांवर कशी मात करता येते, हे ऐकून ऊर भरून आला.

६.नैनो में बदरा छाये : जवानांचा ऋतूंशी चाललेला लढा आणि अहोरात्र सराव या गाण्यातून समोर आला.

७.साथी हाथ बढ़ाना : नैसर्गिक आपत्ती असो वा शांती सेना, जवानांचा 'मदतीचा हात' किती मोलाचा असतो, हे यातून दिसलं.

८.उस मुल्क की सरहद को : इंटेलिजन्स आणि सीमा रक्षणाची जबाबदारी या गाण्याने अधोरेखित केली.

९.जिंकू किंवा मरू : युद्धाचे विविध प्रकार आणि त्यातील रणनीती या गाण्याने स्पष्ट केली.

१०.ऐ देश है वीर जवानो का : आपल्या देशाच्या वीरांची शौर्यगाथा या गाण्याने पुन्हा जिवंत केली.

११.ऐ मेरे वतन के लोगों : भारतीय रेजिमेंट्सचा जाज्वल्य इतिहास या गाण्याने डोळ्यासमोर उभा केला.

१२.रोटी कपडा और मकान : ठऊअ मधील प्रशिक्षण आणि आता स्त्रियांचाही यातील सहभाग, हे ऐकून अभिमान वाटला.

१३.जरा सी आहट होती है : शौर्यपदके आणि सन्मानाची गाथा या गाण्यातून उलगडली.

१४.संदेसे आते है : हे गाणं सुरू झालं आणि सभागृह हेलावलं. सैन्यदलातील सेवा बजावताना जवान जेव्हा सीमेवर असतो, तेव्हा त्याच्या कुटुंबाची होणारी ओढाताण आणि तरीही त्यांचा असणारा खंबीर पाठिंबा या गाण्यातून उलगडला. केवळ उदरनिर्वाहासाठी नव्हे, तर समाजासाठी आपलं सर्वोत्तम योगदान देऊन एक जबाबदार नागरिक म्हणून जगण्याचा वसा या गाण्याने दिला.

१५.अल्लाह तेरो नाम: सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले आपले सैन्य या गाण्यातून दिसले.

१६.प्यार बांटते चलो: 'फ्लॅग डे'साठी केलेले आवाहन आणि मदतीची हाक या गाण्याने दिली.

१७.कर चले हम फिदा: देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची भावना या गाण्याने प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आणलं.

१८.छोड़ो कल की बातें: नवीन भारताच्या उभारणीसाठी दिलीप गुप्ते सरांनी केलेले आवाहन या गाण्याने पूर्ण झाले.

प्रत्येक गाण्यानंतर सभागृहात निर्माण होणारं वातावरण हे केवळ एका कार्यक्रमाचं नव्हतं, तर एका 'कुटुंबाचं' होतं. प्रत्येक गाण्यागणिक प्रेक्षकांमधून येणाऱ्या घोषणा आणि "भारत माता की जय"च्या गर्जनांनी आसमंत दुमदुमून जात होता. निवडणुकांच्या धावपळीत असूनही आर.डी.सी. डॉ.संदीप माने आणि इतर शासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती, त्यांचे जवानांबद्दलचे प्रेम आणि काळजी मनाला स्पर्शून गेली.

माजी सैनिकांचा केलेला सन्मान पाहून कृतज्ञतेने मन भरून आलं. ''फ्लॅग डे म्हणजेच ध्वज दिन निधी'' साठी लोकांनी दिलेला तात्काळ प्रतिसाद हा केवळ पैसा नव्हता, तर ती जवानांप्रति असलेली आपली भावना होती. आम्ही जेव्हा सभागृहाबाहेर पडलो, तेव्हा केवळ गाणी ऐकून बाहेर पडलो नव्हतो, तर एक नवी दृष्टी घेऊन बाहेर पडलो होतो.

मेजर प्रांजल जाधव, दिलीप गुप्ते, हेमंत रणदिवे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने आम्हाला जो अभिमानाचा क्षण दिला, त्याबद्दल मी आणि रोहिणी त्यांचे मनापासून ऋणी आहोत. हा कार्यक्रम 'इंप्रेस' करण्यासाठी नव्हता, तर 'एक्स्प्रेस' करण्यासाठी होता आणि तो आमच्या काळजापर्यंत पोहोचला.

आखाती देशांची 'अरबी' चिंता

सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथे दोन आठवड्यांपूर्वी एक आगळं प्रदर्शन भरलं होतं. ते होतं, अरबी अक्षरांचं. आपली संस्कृती, वारसा आणि अस्मिता दृढ करणाऱ्या या अक्षरांचं सौंदर्य जगाला दाखविणं हा यामागचा एक उद्देश. त्याचबरोबर, आपल्या भाषेकडं जगाला आकर्षित करून त्याद्वारे सांस्कृतिक पर्यटनाला चालना देणं हा दुसरा एक उद्देश. अरबी ही केवळ एक भाषा नाही; तर ती इस्लामी संस्कृतीची वाहक आहे. पवित्र कुराणाची ही भाषा संपूर्ण इस्लामी जगतासाठी एक वारसा आहे. त्याचं केवळ जतनच नव्हे, तर संवर्धन करण्याचं लक्ष्य असलेल्या सौदी अरेबियाच्या ह्याव्हिजन २०३०च्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणूनही हे प्रदर्शन आयोजिण्यात आलं होतं. अरबी भाषा ही काही सौदी अरेबियापुरती मर्यादित असलेली भाषा नाही. सौदीबरोबरच कतार, कुवेत, ओमान, बहारिन आणि संयुक्त अरब अमिराती या आखाती सहकार्य परिषदेच्या (जीसीसी) देशांमधील ती प्रमुख भाषा आहेच; परंतु २६ देशांत तिला अधिकृत भाषेचा दर्जा आहे. भाषकांच्या संख्येच्या निकषावर जगातील पाचव्या क्रमांकाची भाषा असलेली अरबी ही धमार्ची आणि संस्कृतीच नव्हे, तर ज्ञान-विज्ञानाची, शिक्षणाची आणि उद्योगाचीही भाषा आहे. जगभरातील चाळीस कोटींहून अधिक लोक ही भाषा जाणतात. त्यामुळे अरबीसमोर अस्तित्वाचा प्रश्न नाही; परंतु इंग्लिशचं वाढतं आकर्षण आणि अन्य देशांतून आलेले स्थलांतरित यांमुळे आखाती देशांतच अरबी न बोलणाऱ्यांची वाढत असल्याची चिंता त्यांना भेडसावत आहे. त्यामुळेच भाषाविषयक प्रदर्शनाबरोबरच अरबी शिकविण्यापर्यंतचे उपक्रम तिथे राबविले जात आहेत. आखाती देशांतील स्थलांतरितांची संख्या ही तेथील लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक असून, त्यापैकी बहुतेकांना अरबी भाषा येत नाही. कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी अरबी भाषक नसलेल्यांचे प्रमाण याहून अधिक आहे. एकट्या कतारमध्ये हे प्रमाण ९५ टक्के आहे! आपल्या देशांतील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्येला आपली भाषा न येणं म्हणूनच 'जीसीसी' देशांना चिंताजनक वाटत असून, ही संख्या अशीच वाढल्यास आपली अरबी अस्मिताही धोक्यात येऊ शकते, अशी भीती तेथील काही जण व्यक्त करीत आहेत. या भीतीमागे दोन ठळक कारणं आहेत. पहिलं कारण स्थलांतरित कामगारांचं आहे. स्थलांतरितांत प्रामुख्यानं दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांतील कामगार आहेत. 'ते ज्या देशांतून आले आहेत, तेथील संस्कृतीही संपन्न आहे. आखाती देशांत आल्यावरही ते विविध उपक्रमांद्वारे आपली भाषा आणि संस्कृती स्वतःपुरता टिकविण्याचा प्रयत्न करतात. ते अरबी भाषा शिकत नाहीत; किंवा अर्धवट शिकतात. अरबी बोलताना ते आपल्या भाषांतील शब्द अरबीत घुसवतात. यामुळे अरबी भाषा दूषित होत आहे,' असं मत तेथील काही अभ्यासक मांडत आहेत. स्थलांतरितांना अरबी शिकवितानाच अरबी संस्कृती अधिक ठळक करण्यासाठी काय करता येईल, याबाबत २०१३मध्ये सौदी अरेबियात परिषद झाली होती. आशियाई देशांतून आलेले लोक जी मोडकी-तोडकी अरबी बोलतात, त्याचा परिणाम अरबी मुलांच्या भाषेवर होत असल्याचा शोधनिबंध या परिषदेत सादर करण्यात आला होता.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,१३ जानेवारी २०२६ ते १९ जानेवारी २०२६

महाराष्ट्र हादरला, मुलीसोबत कॉफी पिल्याने जमावाकडून सुलेमानची हत्या

आरोपींना जामीन अन् कुटुंबाने भितीने गाव सोडलं!



आई-वडील काय म्हणाले?

मृत मुलाचे वडील रहीम खान म्हणाले, ह्ममाज्या मुलाला त्याच्याच ओळखीच्या लोकांनी फिल्मी पद्धतीने घेरून मारलं. गावात असूनही कोणी त्याला वाचवलं नाही. आरोपींना पाहिलं की भीती वाटते. गावकऱ्यांवरच विश्वास उरलेला नाही.ह्व त्यांनी सरकारकडे न्यायाची मागणी करत, ह्ममाझा सुलेमान गेला, पण आता कुणाचाही सुलेमान जाऊ नये,ह्व अशी भावना व्यक्त केली. सुलेमानची आई तबस्सुम यांचे अश्रू थांबत नाहीत. ह्ममाज्या एकुलत्या एक मुलाला जनावरांपेक्षा वाईट वागणूक देत मारण्यात आलं. त्या गावात परत जाण्याची हिंमत नाही,ह्व असं त्या म्हणाल्या. दरम्यान, सुलेमानचे मेहुणे महबूब खान यांनी आरोपींना मिळालेल्या जामिनाविरोधात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी त्यांची मागणी आहे. आज सुलेमानचे आई-वडील बेटावद गावातील चार खोल्यांचं स्वतःचं घर सोडून, दुसऱ्या गावात अवघ्या ८८ च्या भाड्याच्या खोलीत भीतीच्या सावटाखाली आयुष्य जगत आहेत.

बीड। जळगाव जिल्ह्यातील जामनेर शहरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरलाय. तरुणीच्या सोबतकॉफी पिताना दिसल्याने जमावाने तरुणाला सातत्याने बेदम मारहाण केली. या अमानुष मारहाणीत २० वर्षीय सुलेमान खानचा ऑगस्ट महिन्यात मृत्यू झाला होता. मात्र, या प्रकरणातील काही आरोपींना 3 महिन्यांत जामीन मंजूर झाला. त्यामुळे सुलेमानच्या आई-वडिलांनी भीतीने गाव सोडण्याचा निर्णय घेतलाय. विशेष म्हणजे या कुटुंबाच्या अनेक पिढ्या बेटावद या गावात राहात होत्या. मात्र, जीवाच्या भीतीने कुटुंबियांवर गाव सोडण्याची वेळ आलीये. अधिकची माहिती अशी की, ऑगस्ट महिन्याच्या ११ तारखेला जामनेर शहरातील 'द ब्रँड' नावाच्या चहा कॅफेमध्ये सुलेमान खान हा आपल्या ओळखीच्या तरुणीसोबत बसला होता. याचवेळी ८ ते १० तरुणांचा एक जमाव तेथे आला आणि कोणताही वाद न घालता सुलेमानवर तुटून पडला. कॅफेमध्येच त्याला बेदम मारहाण करण्यात आली. त्यानंतरही मारहाण थांबली नाही.

जखमी अवस्थेतील सुलेमानला दुचाकीवर बसवून दुसऱ्या गावात नेण्यात आलं आणि तिथेही त्याला मारहाण करण्यात आली. इतकंच नाही तर आरोपींनी सुलेमानला थेट त्याच्या बेटावद गावात आणून त्याच्या आई-वडिलांसमोर पुन्हा बेदम मारलं. या अमानुष मारहाणीत सुलेमान गंभीर जखमी झाला. नातेवाइकांनी त्याला जामनेर येथील रुग्णालयात दाखल केलं, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. सुलेमानचे वडील रहीम खान यांच्या तक्रारीवरून जामनेर पोलीस ठाण्यात ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेच्या रात्रीच चार आरोपींना अटक करण्यात आली, तर काही दिवसांनी आणखी सहा जणांना अटक करण्यात आली. अद्याप एक आरोपी फरार असून तो संबंधित चहा कॅफेच्या मालकाचा लहान भाऊ असल्याची माहिती समोर आली आहे. अलीकडेच या प्रकरणातील चार आरोपींना जामीन मंजूर झाला. विशेष म्हणजे हे आरोपी सुलेमानच्या गावातीलच असल्याचं समोर आलं आहे. आरोपींना जामीन मिळाल्याची माहिती कळताच सुलेमानच्या आई-वडिलांना मोठा धक्का बसला. काही वेळा आरोपी समोर दिसल्याने सुलेमानच्या वडिलांना मुलाच्या मारहाणीचे भयावह दृश्य पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येऊ लागले. जीवाला धोका असल्याची भीती सतावत असल्याने त्यांनी नोव्हेंबर महिन्यात कोणालाही न सांगता आपलं बेटावद गाव सोडून बुलढाणा जिल्ह्यातील धामणगाव बढे येथे आश्रय घेतला.

"तिच्या पोटात जीनचं बाळ आहे आणि..."

उपचाराच्या नावाखाली मांत्रिकाचं पीडितेसोबत मंदिरात नको ते कृत्य...

मुंबई। उत्तर प्रदेशातील आग्रा येथून खोट्या मांत्रिक टोळीचं भयानक प्रकरण उघडकीस आलं आहे. या टोळीतील एका व्यक्तीने अल्पवयीन मुलीच्या पोटात जीनचं बाळ असल्याचं सांगून तिच्या कुटुंबियांना घाबरवलं आणि त्यांना त्यांच्या मुलीला या समस्येवरील उपचारांसाठी त्याच टोळीतील एका बाबाकडे पाठवण्यासाठी प्रवृत्त केलं. भिती आणि अंधश्रद्धेला आहारी जाऊन कुटुंबियांनी मुलीच्या उपचारांसाठी तिला त्या मांत्रिकाकडे पाठवलं. मात्र, त्यानंतर तरुणीसोबत धक्कादायक घटना घडल्याचं वृत्त आहे.



नग्न अवस्थेत व्हिडीओ शूट केला अन्...

आरोपानुसार, त्या मांत्रिकाने अल्पवयीन पीडितेला मंदिराच्या आवारात बनलेल्या एका खोलीत नेऊन बळजबरीने तिला कपडे काढण्यास भाग पाडलं. त्यानंतर, पीडितेने यासाठी विरोध केल्यानंतर, मांत्रिकाने तिच्या कुटुंबियांना तिची बदनामी करण्याची धमकी दिली. इतकेच नव्हे तर, त्याने तिच्यासोबत घृणास्पद कृत्य केलं आणि नग्न अवस्थेत तिचा व्हिडीओ बनवला. बदनामीच्या भीतीमुळे, त्या मांत्रिकाने पीडितेच्या कुटुंबाकडून जवळपास तीन लाख रुपये उकळले. घटनेनंतर, आरोपींनी पीडितेच्या कुटुंबियांना मोबाईल फोनवर शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. सध्या या प्रकरणात आरोपी मांत्रिक, त्याची पत्नी आणि त्याचा साथीदार यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन मांत्रिकाकडे पाठवलं...

अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन कुटुंबियांनी कोणत्याही मेडिकल तापसणीशिवाय आपल्या मुलीला मांत्रिकाकडे पाठवण्याचं ठरवलं. त्या मांत्रिकाशी संपर्क साधला असता त्याने पुजेच्या बहाण्याने पीडितेला अमरपुरा येथील एका मंदिरात बोलवलं. मुलीला घेऊन कुटुंबीय आरोपी मांत्रिकाकडे गेलं आणि त्यावेळी, अल्पवयीन मुलगी ६ महिन्याची गर्भवती असून तिच्या पोटात जीनचं बाळ आहे आणि हे तिच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं, असं सांगून त्याने तिच्या कुटुंबियांना घाबरवलं.

'मी घटस्फोट देऊन तुझ्याशी...'

बीडमध्ये पोलीस अधिकाऱ्याचे महिलेला लग्नाचे आमिष, नंतर लॉजवर नेत केला अत्याचार

जातीवाचक शिवीगाळ

या प्रकरणात कर्मचाऱ्याकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून पीडितेनं कायदेशीर कारवाई करून लढा दिला. तिने या प्रकरणी लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. या प्रकरणी जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.



बीड। बीडमध्ये माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना घडली आहे. एका पोलीस अधिकाऱ्याने महिलेला लग्नाचे आमिष दाखवले आणि नंतर अत्याचार केल्याचा प्रकार आता उघडकीस आला आहे. या प्रकरणी आता पीडितेनं पोलीस ठाणे गाठून पोलिसावर कारवाईची मागणी केली. घडलेल्या घटनेनुसार, पीडित महिला ही २०२२ पासून पतीपासून विभक्त राहत होती. कौटुंबिक वादात आणि कायदेशीर रित्या कचाट्यात सापडलेल्या महिलेचा पोलिसाने गैरफायदा घेतला.

'माझं पत्नीशी पटत नाही, मी घटस्फोट देऊन तुज्याशी विवाह करेन...'

'मी पोलीस असून तुला कोर्टाच्या कामात न्याय मिळवून देण्याचे आमिष दाखवले', असा विश्वास पीडितेला दिला होता. 'माझ्या पत्नीशी माझं पटत नाही, तिला घटस्फोट देऊन मी तुझ्याशी विवाह करेन', असे खोटे आश्वासन देऊन त्याने तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. या प्रकरणाला भयंकर वळण प्राप्त झालं. आरोपीने महिलेला माजलगाव येथील एका लॉजवर नेण्यात आले होते. तिथे विवाहाचे आश्वासन देऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला.

या प्रकरणात पीडितेनं आरोप केला की, उत्तेजक गोळ्यांचे सेवन केले होते, ज्यात तिला गंभीर शारीरिक इजा देखील झाली होती. पीडितेला रुग्णालयात दाखल करून तिला तीन टाके पाडण्यात आल्याचे वृत्त आहे. या उपचाराचा खर्च हा ऑनलाइन स्वरुपात भरण्यात आला होता, आता या गुन्ह्यात महत्त्वाचा तांत्रिक पुरावा मानला जात आहे.

पीडितेचा लग्नासाठी तगादा

पीडितेनं या सर्व प्रकरणानंतर लग्नासाठी तागादा लावला, तेव्हा आरोपीने तिला धमकावण्यास सुरुवात केली. मी पोलीस आहे. वरिष्ठ अधिकारी हे माझ्या ओळखीचे आहेत, ते माझे काहीही करू शकत नाहीस, असं म्हणत त्याने तिला तुच्छ वागणूक दिली. पीडितेचे खासगी फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिली. यासोबत तिला नंतर जातीवाचक शिवीगाळ देखील करण्यात आली होती.

आईचे ५० वर्षीय पुरुषासोबत संबंध, मुलगी एकटी असताना अचानक घरात घुसला अन्... शेवटी, असह्य तरुणीचं भयानक कृत्य!

मुंबई। उत्तर प्रदेशातील बांदाच्या मुरवल गावातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका १९ वर्षीय तरुणीने भयंकर कृत्य केल्याचं वृत्त आहे. १ जानेवारी रोजी पीडिता घरी असताना एक शेजारी राहणारा ५० वर्षीय पुरूष दारूच्या नशेत तिच्या घरात घुसला आणि तरुणीला पाहताच त्याची नियत फिरली. त्याने तिच्यासोबत घृणास्पद कृत्य करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी, पीडितेने त्याला विरोध केला. मात्र, तो शेजारी थांबण्याचं नाव घेत नव्हता. शेवटी, तरुणीला नाईलाजाने त्याच्यावर कुऱ्हाडीने हल्ला करावा लागला. यामध्ये, संबंधित व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला.



आईचा प्रियकर सतत घरी यायचा अन्...

मिळालेल्या माहितीनुसार, मृत पुरूष मुलीच्या घरी वारंवार यायचा. खरं तर, त्याचे पीडितेच्या आईसोबत संबंध असल्याचं सांगितलं जात आहे. तिच्या वडिलांचं आधीच निधन झालं होतं. संबंधित तरुणाला आईच्या प्रियकराचं घरी येणं अजिबात आवडत नव्हतं. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला तो तिच्या घरी आला तेव्हा तरुणीला पाहून त्याची नियत फिरली. दारूच्या नशेत असताना त्याने तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला.

दारूच्या नशेत विनयभंगाचा प्रयत्न अन् कुऱ्हाडीने हत्या...

दरम्यान, पीडितेने त्याच्या कृत्याला विरोध केला आणि तीव्र निषेध केला. पण वासनांध पुरूष तिच्यावर जबरदस्ती करत राहिला. पुरुषाचं वागणं मर्यादेपलिकडे गेल्यानंतर, तरुणीने नाईलाजाने भयानक कृत्य केलं. तिने तिच्याजवळ असलेली धारदार कुऱ्हाड उचलली आणि त्या पुरूषावर वार करू लागली. या जीवघेण्या हल्ल्यामुळे तो गंभीररित्या जखमी झाला आणि रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला. यामध्ये, त्याचा जागीच मृत्यू झाला.

पोलिसांच्या माहितीनुसार, १ जानेवारी रोजी संबंधित तरुणीने त्याच्या शेजारी राहणाऱ्या ५० वर्षीय तरुणाची हत्या केली. या घटनेची पोलिसांना माहिती मिळताच, त्यांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि पोस्टमॉर्टमसाठी पाठवला. पोलिसांनी तरुणीला अटक केली असून या प्रकरणात पुढील कारवाई केली जाणार आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९/२४०२५६३

जावक क्र.:-व.वि.श.म./क.वि./००४/२५-२६

दिनांक :- ०७/०१/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्र.	रिसीट नं.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव	खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	नाळा-५	NL०५/१२/१	१५८०२	मनवेल फरशा लोपीस	मर्शीन मनवेल लोपीस
२	निर्मळ-१	NL०१/५१९/८	१९०५२	विष्णू निरुपम विश्वास	निलम भारत जाधव
३	नाळा-५	NL०५/३३	१५८३४	मनवेल (मनू) फरशा लोपीस	मर्शीन मनवेल लोपीस
४	नाळा-१	NL०१/५५	१७३८०	विल्यम सायमन लोपीस	रॉबर्ट बावतीस डाबरे
५	नवाळे-४	NV०४/२२०	१८१९५	सॅन्ड्र डॉमणिक क्लेरेन्स व सायमन जेनिल्यलस एन्थोनी	विलेफड रजीन आल्मेडा
६	निर्मळ-१	NL०१/३८८/९	१७९६२	रामक्रिष्णा उगा पुजारी	प्रकाश भास्कर कोटीयन
७	वाघोली-१	WG०१/८४३/१	२०८४२	प्रविन अनंत नाईक	मीली विश्वास मोरे
८	वाघोली-१	WG०१/८४३/२	२०८४५	भावेश अनंत नाईक	मीली विश्वास मोरे
९	निर्मळ-१	NL०१/७८	१९२५१	सुकरी लक्ष्मण वरठा	महेश अशोक वरठा
१०	वाघोली-१	WG०१/१०२१	१७५०८	दमयंती दत्तात्रेय देशमुख	किशोर भाऊ नाईक व जयवंत भाऊ नाईक
११	सोपारा-१	NL३१/८४/३७	१९७४९	सर्जेराव दशरथ वैद्य	सुयोग शंकर नागले
१२	सोपारा-२	NL३२/६१०/२	१९७५१	रोशन सलीम बगदादी	इस्माईल रईस अलदा
१३	सोपारा-२	NL३२/५५७/१७	१९७५०	उजमा घांची	आबिद आरिफ नुर
१४	समेळ-२	NL०९/१४८/६	१७८७०	नजीब चावरे रमेश शेषराव तांदळे	अंकुश अर्जुन शिंदे /स्मीता अंकुश शिंदे
१५	सोपारा-२	NL३२/६०८/५	१७९८४	रोहन पाठारे	प्रकाश गोपाळ खोत
१६	समेळ-१	NL०८/२६६/५२	१६६४१	धिरज बिल्डर्स ॲन्ड डेव्ह.	सुशिला राजकुमार गुप्ता
१७	समेळ-२	NL०९/१००/३६	१६६३९	अनमोल डेव्ह.	रघुनाथ वासूदेव वारंग

XXX

(निता कोरे)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com